● *नागीन*नंतर कल्याणजींनी काढलेला क्ले-व्हायोलिनचा पुंगी सूर *मदारी*तदेखील उमटला ● *सट्टा बाजार*मधील दोन गाण्यांनी गीतकार गुलशन बावरा यांना ओळख दिली ● *चाँद* या एकमेव चित्रपटात लता मंगेशकरबरोबर सुमन कल्याणपूर यांनी गीतगायन केलं ● *नई राहे* कधी आला आणि गेला ते कोणाला कळले नाही. परंतु त्याचे संगीत मात्र चांगलेच लोकप्रिय झाले होते.

□ इसाक मुजावर

मदारी (१९५९) :

कल्याणजींनी कल्याणजी वीरजी शाह या नावाने एकट्याने संगीत दिग्दर्शन करीत असताना आपले बंधू आनंदजी यांच्याबरोबर आपली जोडी सर्वात प्रथम जमवली ती १९५९च्या *मदारी* या चित्रपटात. *बेदर्द जमाना क्या जाने* या चित्रपटात मुकेशचा आवाज आपल्या संगीतात सर्वात प्रथम घेताना कल्याणजींनी त्याच्याबरोबर रफीचा आवाजदेखील त्या चित्रपटात घेतला होता. पण *मदारी*मध्ये मात्र गायकाच्या गाण्यासाठी एकट्या मुकेशचा आवाज त्यांनी मर्यादित ठेवला होता. 'मैं हूं मस्त मदारी...' हे या चित्रपटाचे शीर्षक गीत या चित्रपटात दोन भागात होते. एक भाग मुकेशच्या एकट्याच्या आवाजात होता. दुसऱ्या भागात त्याच्याबरोबर लताबाई व कोरसचा आवाज होता.

१९५४च्या *नागीन* या चित्रपटापासून आपल्या अनेक चित्रपटांत सापांची वळवळ सुरू झाली होती. आणि त्या चित्रपटान क्ले-व्हायोलिन या वाद्यातून कल्याणजींनी काढलेला पुंगीचा स्वर अनेक चित्रपटांतील संगीतात ऐकू येऊ लागला होता. *मदारी* हा चित्रपट गारुड्याच्या जीवनावरील एक चित्रपट असल्यामुळे या चित्रपटाच्या संगीतातदेखील हा पुंगीचा सूर होताच. 'दिल लुटनेवाले जादूगर अब मैंने तुम्हे पहचाना है...' हे लताबाईंनी गायलेले गाणे तर पूर्णपणे पुंगीच्या सुरातच फुलले होते. 'मैं हू मस्त मदारी...' या गाण्यातदेखील हा पुंगी सूर होताच. *ओ तेरा क्या कहना*नंतर कमल बारोटचा आवाज *मदारी*त पुन्हा कल्याणजी-आनंदजींच्या संगीतात ऐकू आला होता. आणि तो गायकीतील तिच्या दैवतावरोबर लताबाईंच्या बरोबर. 'अकेली मोहे छोड न जाना...' हे गाणे कमल बारोटने या चित्रपटात लताबाईंच्या बरोबर गायले होते. 'दिल लुटनेवाले...'बरोबरच या चित्रपटातील 'नजर भी खोई खोई, है तुम्हारे प्यार का नशा...', 'हम तो मिट जायेंगे प्यार मेरा मजबूर सैया...', 'कोई कहे रसिया, कोई मन बसिया...', 'तिरछी नजर का पिया वार है...' ही आणखी चार गाणी लताबाईंच्या एकटीच्या आवाजात होती.

'हम तो मिट जायेंगे...','कोई कहे रसिया...', 'मैं हूं मस्त मदारी...' ही या चित्रपटातील गाणी पं. मधुरनी लिहिली होती. 'दिल लुटनेवाले जादूगर...', 'अकेली मोहे छोड न जाओ...', 'नजर भी खोई खोई है...' ही गाणी फारुख कैसरनी व 'तिरछी नजर का पिया वार है...' हे गाणे प्यारेलाल संतोषींनी लिहिली.



मदारी

सट्टा बाजार (१९५९) :

रफी कल्याणजींच्या *सम्राट चंद्रगुप्त* या पहिल्या चित्रपटापासून त्यांच्या संगीतात गात असला तरी त्याच्या गायकीवर जॉनी वॉकरी गाण्यांचा रंग *सट्टा बाजार* या चित्रपटातच त्यांच्या संगीतात सर्वात प्रथम चढला. बलराज सहानींची या चित्रपटात प्रमुख भूमिका होती. अशोककुमारप्रमाणेच त्यांच्या भूमिकांनादेखील *सट्टा बाजार*च्या काळात प्रौढत्व आले होते. या प्रौढत्वामुळेच अशोककुमारप्रमाणेच या काळातील त्यांच्या भूमिका गीतविरहित असायच्या. आणि त्यांच्या गीतविरहित भूमिकांतदेखील चित्रपटात कोठे गाण्यांची उणीव जाणवू नये यासाठी त्यांची भूमिका असलेल्या चित्रपटात जॉनी वॉकरच्या भूमिकेसाठी खास जागा निर्माण केली जायची. *सट्टा बाजार* याला अपवाद नव्हता. या चित्रपटातदेखील त्याची भूमिका अशीच निर्माण केली गेली होती. आणि चित्रपटातील सात गाण्यांपैकी तीन गाणी त्याच्यावर चित्रित करण्यात आली होती.

यापैकी एक गाणे म्हणजे या चित्रपटाचे शीर्षक होते 'आकडे का धंदा इक दिन तेजी सौ दिन...' रफीने हे गाणे खास जॉनी वॉकरी ढंगाने गायले होते. हे गाणे एकट्याने गात असताना या चित्रपटातील 'जा जा न छेड मान भी जा हमे फिर फिर न घेर आ भी जा...' व 'जहा ठहरो जी अब्दुल गफार, रुमाल मेरा लेके जाना...' ही दोन गाणी सुमन कल्याणपूरबरोबर गायली होती. ही गाणीदेखील जॉनी वॉकरी ढंगातील होती.

हेमंतकुमारचा आवाज कल्याणजी-आनंदजींनी या चित्रपटातील दोन गाण्यात घेतला होता. या दोन गाण्यांपैकी एक गाणे सोलो होते. या गाण्याचे बोल होते, 'चांदी के चंद टुकडों के लिए इमान को बेचा जाता है...' दुसरे गाणे हेमंतकुमारने लताबाईंच्याबरोबर गायले होते. गाण्याचे बोल होते 'तुम्हे याद होगा कभी हम मिले थे, मोहब्बत की राहो में मिल के चले थे...' सुरेश व विजया चौधरी यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले होते. या दोन गाण्यांच्यामुळेच गीतकार गुलशन बावरा यांची ओळख निर्माण झाली. या दोन गाण्यांबरोबरच 'आकडे का धंदा...' हे या चित्रपटाचं शीर्षक गीतदेखील गुलशन बावरांनीच लिहिलं होतं. हेमंतकुमारबरोबर एक गाणं असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'क्या रहा जाने को अब कैसा इन्साफ तेरा...' हे गाणे एकटीने गायले होते. इंदीवरनी लिहिलेले हे गाणे मीनाकुमारीवर चित्रित करण्यात आले होते. रफी व सुमन यांचा 'जा जा न छेड मान भी जा...' हे या चित्रपटातील गाणे शैलेंद्रनी लिहिले होते. तर 'जहा ठहरो जी अब्दुल गफार...' हे गाणे हसरतनी. 'निगाह नीची किए तुम्हारी याद आए, जिया को तडपाये...' हे आणखी एक गाणे

या चित्रपटात होते. या गाण्याविषयी काहीच माहिती आज उपलब्ध नाही.


चाँद(१९५९):

लता मंगेशकर यांच्या आवाजाशी मिळता जुळता असलेला आवाज घेऊन सुमन कल्याणपूर हिंदी चित्रपट संगीतात उदयाला आली. पण लताबाईंच्याबरोबर गायची संधी मात्र तिला एकाच चित्रपटात मिळाली. हा चित्रपट म्हणजे १९५९चा लेखराज भाकरींचा *चाँद*. *सट्टा बाजार*प्रमाणेच या चित्रपटातदेखील मीनाकुमारी व बलराज सहानी यांची प्रमुख भूमिका होती. आणि या चित्रपटातील 'कभी आज कभी कल कभी परसो ऐसी ही बाते...' हे गाणे लता व सुमन यांनी गायले होते. त्या दोघींनी एकत्र गायलेले चित्रपट संगीतातील हे एकुलते एक गाणे.

हेमंतकुमार या चित्रपटाचे संगीतकार होते. स्वतःचे संगीत असलेल्या चित्रपटात ते स्वतः गायचे. आणि स्वतःचे गाणे नसेल तर रफी, तलत, मन्ना डे यांना गायला लावायचे. पण *चाँद*मधील त्यांच्या संगीताचं वैशिष्ट्य हे होतं की या चित्रपटात त्यांचे स्वतःचे गाणे नव्हते. रफी, मन्ना डे वा तलत यांचेदेखील गाणे नव्हते. याचा अर्थ या चित्रपटात गायकाचे गाणे नव्हतेच असा नव्हे. १९५८च्या *अलहिलाल* या चित्रपटातील इस्माईल आजाद यांच्या 'हमे तो लुट लिया मिल के हुस्नवालो ने...' या कव्वालीचे विडंबन करणारी एक कव्वाली या चित्रपटात होती. या कव्वालीचे बोल होते. 'गलत है लूट लिया तुमको हुस्नवालो ने...'. १९५५च्या *आजाद*मध्ये 'मरना भी मुहब्बत में किसी काम न आया...' ही कव्वाली गाणाऱ्या रंगनाथ जाधवना ही कव्वाली हेमंतकुमारनी या चित्रपटात गायला लावली होती. या कव्वालीतला रंगनाथ जाधव यांचा आवाज वगळता हेमंतकुमारनी या चित्रपटातील बाकीची गाणी गायिकेच्या आवाजातच फुलवली होती. आणि गायिकेच्या आवाजात लता मंगेशकर यांचा आवाजच या चित्रपटातला प्रमुख आवाज होता.

सुमन कल्याणपूरबरोबर एक गाणे गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'खोई खोई अंखिया नींद बिनो देख रही है अब सपना...' व 'ऐ बादलो रिमझिम के रंग लिए कहाँ चले...' ही दोन गाणी एकटीने गायली होती. तर 'आ जा री चाँदनी हमारी गली चाँद लेके आजा...' हे गाणे कोरसबरोबर. ही गाणी या चित्रपटात मीनाकुमारीवर चित्रित करण्यात आली होती. 'मुस्कुरा ओ लाडले दूर हो अंधेरा...' हे आणखी एक गाणे या चित्रपटात होते. पण या गाण्याविषयी काहीच माहिती आज उपलब्ध नाही. या चित्रपटातील रंगनाथ जाधव यांनी गायलेली कव्वाली अख्तर लखनवींनी लिहिली होती. बाकीची एकजात सारी गाणी शैलेंद्रनी.

१९५८-१९५९च्या काळात मनोजकुमार आपल्या चित्रपटातला अंधारात कोठेतरी चाचपडणारा एक कलावंत होता. या चाचपडण्यात १९५८च्या लेखराज भाकरी यांच्या *सहारा*मध्ये त्याने एक छोटीशी भूमिका केली होती. *चाँद*मध्येदेखील तो एका छोट्या भूमिकेत चमकला होता. कुलदीप कौर त्या काळातील आपल्या चित्रपटातील एक आघाडीची खलनायिका होती. *चाँद*द्वाराच तिच्या


गुलशन बावरा


सुमन कल्याणपूर

रुपेरी जीवनाचा शेवट झाला. १९५९ साली हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यानंतर ३ फेब्रुवारी १९६०ला तिचे निधन झाले.

नई राहें(१९५९):

१९५९ साली हेमंतकुमारनी *चाँद* व *हम भी इन्सान है* या दोनच चित्रपटांना संगीत दिले तर त्यांचे शिष्य रवी यांनी *चिराग कहां रोशनी कहां*, *जवानी की हवा*, *पहली रात*, *नई राहें* या चार चित्रपटांना संगीत दिले. यापैकी *पहली रात* म्हणजे १९४५च्या *जीनत*चा रिमेक होता. *जीनत* संगीतासाठी इतका गाजला होता की, आजही तो केवळ संगीतासाठीच अनेकांच्या लक्षात आहे. पण *जीनत*च्या संगीताचा गोडवा काही *पहली रात*च्या संगीतात नव्हता. यामुळे हा चित्रपट केव्हा आला नि केव्हा गेला हे कोणाला कळलेदेखील नाही. *नई राहें*देखील फारसा चालला नाही. तरीही या चित्रपटातील संगीत मात्र चांगलेच लोकप्रिय ठरले होते. हेमंतकुमारनी संगीतबद्ध केलेल्या १९५९च्या *चाँद* या चित्रपटाच्या नावात *चाँद* असला तरी या चित्रपटातील एकाही गाण्यात *चाँद* हा शब्द नव्हता. *नई राहें*मध्ये मात्र *चाँद* हा शब्द असलेले दोन भागाचे एक गाणे होते. या गाण्याचे बोल होते. 'कल के चाँद आज के सपने, तुमको प्यार बहुतसा प्यार...' या गाण्याचा एक भाग हेमंतकुमारने गायला होता. तर दुसरा भाग लता व हेमंतकुमार यांनी. दोन भागांतील आणखी एक गाणे या चित्रपटात होते. 'कहां तेरी मंजिल, कहां है ठिकाना...' या गाण्याच्या दुसऱ्या भागाचे बोल होते 'किस की मंजिल कहां का ठिकाना, हो गया खत्म सारा जमाना...' या गाण्याचा पहिला भाग रफीने गायला होता व दुसरा भाग लताबाईंनी.

'कल के चाँद आज के सपने...' या गाण्याबरोबरच हेमंतकुमार व लताबाईंनी या चित्रपटातले 'ये झुमते नजारे तुम पास हो हमारे...' हे आणखी एक गाणे गायले होते. 'तो से लागे नैन कल न परत...' हे या चित्रपटातील गाणे रफी व आशा भोसले यांच्या आवाजात होते. अशोककुमार व गीताबाली यांनी या चित्रपटात प्रमुख भूमिका केली असली तरी अनुपकुमार व शुभा खोटे यांची जोडी या चित्रपटातील तरुण नायक-नायिकेच्या भूमिकेत चमकली होती. आणि या चित्रपटातील द्वंद्वगीतं प्रामुख्याने त्यांच्यावरच चित्रित करण्यात आली होती. 'तेरी चुलबुली चाल...' हे या चित्रपटातील नृत्यगीत लता व गीता यांनी गायले होते. आणि ते मजरूहनी लिहिले होते. 'कहां तेरी मंजील कहाँ तेरा ठिकाना...' हे गाणे गोपालसिंह नेपालींनी लिहिले होते. तर 'ये झुमते नजारे...' प्रेम धवननी. बाकीची गाणी शैलेंद्रनी.

देवेंद्र गोयल *नई राहें*चे निर्माते होते. निर्माता-दिग्दर्शक ब्रिज त्यांचे मेहुणे. देवेंद्र गोयल यांच्या हाताखाली ते अनेक वर्षे सहाय्यक म्हणून वावरत होते. नंतर ते एक यशस्वी दिग्दर्शक बनले. *नई राहें*पासून त्यांच्या दिग्दर्शनीय कारकीर्दीची सुरुवात झाली. देवेंद्र गोयलनी या चित्रपटातच त्यांना स्वतंत्र दिग्दर्शक बनण्याची संधी सर्वात प्रथम दिली. दिग्दर्शन करीत असताना ते अनेकदा चित्रपटांत लहान सहान भूमिका करायचे. *नई राहें*त त्यांनी गीताबालीच्या भावाची भूमिका केली होती. ●